# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६
(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२–२२३१०४ E-Mail : registrar.gondwanauniversity@gmail.com


जा.क्र./गोंवीग/कुसका/ 6584 /२०१७ दिनांक 02/12/2017

## अधिसभा, विद्या परिषद आणि अभ्यासमंडळ निवडणूक-२०१७

## मतदारांना महत्वाच्या सुचना

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६ च्या कलम २८ नुसार अधिसभा, कलम ३२ नुसार विद्या परिषद व कलम ४० नुसार अभ्यास मंडळ या प्राधिकरणांवर सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी विद्यापीठाद्वारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या सुचना/अधिसुचना नुसार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६ कलम २८(२)(ण), २८(२)(त), २८(२)(द), २८(२)(ध), २८(२)(न) नुसार अनुक्रमे प्राचार्य, व्यवस्थापन प्रतिनिधी, महाविद्यालयीन अध्यापक, विद्यापीठ अध्यापक आणि नोंदणीकृत पदवीधर गटातून तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६ च्या कलम ३२(२)(छ) नुसार विद्या परिषदेवर प्रत्येक विद्याशाखेचे २ याप्रमाणे महाविद्यालयीन अध्यापक आणि कलम ४०(२)(ग) नुसार अभ्यास मंडळावर संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांमधील विभाग प्रमुख (अभ्यास मंडळातील प्रत्येक विषयावर ३ याप्रमाणे) निवडून द्यावयाचे आहेत. याकरीता अधिसूचना क्रमांक गोविग/कुसका/६८१२/२०१७ दि. ३१/१०/२०१७ नुसार संबंधीत निर्वाचन गणाकरीता सदस्य निवडणूकीद्वारे निवडून देण्यासाठी अधिसुचना निर्गमीत करण्यात आली होती.

सबब या अधिसूचनेद्वारे वर नमुद सर्व निर्वाचन गणाच्या मतदारांना मतदान करतांना सोयीचे व सुलभ व्हावे या दृष्टीकोनातून खालील सुचना देण्यात येत आहे. कृपया मतदानापूर्वी अवश्य अवलोकन करून कार्यवाही घ्यावी.

१. उपरोक्त निवडणूक प्रक्रीया ही अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात व शांततेत पार पाडावी.

२. उपरोक्त प्रक्रीया सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासनाला सर्वतोपरी सहकार्य करावे.

३. मतदानाच्या दिवशी मतदान केंद्र परिसरात तसेच मत मोजणीच्या दिवशी मतमोजणी केंद्र परिसरात संपूर्ण शांतता राखावी व नियमांचे पालन करावे.

४. मतदान केंद्राच्या १०० मिटर परिसरात कोणत्याही प्रकारचा उमेदवाराचा प्रचार करता येणार नाही.

५. मतदान केंद्रावर मतदाराची ओळख पटविण्यास्तव खाली नमुद प्रकारचे कोणतेही ओळखपत्र दाखविल्यावरच व त्यानुसार संबंधितांची ओळख पटल्यावरच त्यास मतदान करता येईल.

अ) आधारकार्ड

ब) भारत सरकार निवडणूक आयोगाचे ओळखपत्र

क) पारपत्र (पासपोर्ट)

ड) वाहन परवाना (ड्रायव्हींग लायसन्स)

इ) विद्यापीठ/शासकीय कार्यालय यांचेद्वारा निर्गमित करण्यात आलेले ओळखपत्र

ई) पॅनकार्ड

६. ओळखपत्र व त्याच्या पडताळणीशिवाय मतदान करता येणार नाही.

७. मतदाराने त्याच्या डाव्या हाताच्या अंगठया लगतच्या बोटावरील नखाच्या मुळापासून न पुसल्या जाणाऱ्या शाईने खुण करण्यास्तव मतदान अधिकाऱ्यास सहकार्य करावे. तसे करू न दिल्यास मतदान करू दिल्या जाणार नाही.

८. मतदाराने त्याच्या डाव्या हाताच्या अंगठया लगतच्या बोटावर अंकीत खुण मतदान अधिकारी यांना दाखविल्यानंतर त्यास मतपत्रिका घेण्यापूर्वी मार्क मतदार यादीवर स्वाक्षरी करणे अनिवार्य राहील. तसे न केल्यास त्यास मतपत्रिका दिल्या जाणार नाही.

९. मतदाराने त्याचे नाव असलेल्या सर्व निर्वाचन गणाच्या संपूर्ण मतपत्रिका प्राप्त झाले अथवा नाही याबाबत प्रथम खात्री करावी. त्यानंतर पसंतीक्रम नोंदवून त्या सर्व मतपत्रिका मतपेटी मध्येच टाकाव्यात. दिलेल्या मत पत्रिकेपैकी कोणतिही मतपत्रिका मतदान कक्षाच्या बाहेर घेउन जाने हा गुन्हा समजण्यात येईल.

१०. मतदान करतांना प्राप्त सर्व मतपत्रिकांवर पसंतीक्रम नोंदवावा. पसंतीक्रम नोंदविला नसल्यास उपरोक्त मतपत्रिका बाद ठरविण्यात येईल.

११. मतपत्रिकेवर पसंतीक्रम नोंदविणे म्हणजे मतपत्रिकेवर उमेदवारांच्या नावासमोरील निर्देशित जागेवर केवळ **१** नमुद करणे असा आहे. दुसरा पसंतीक्रम याचा अर्थ उमेदवाराच्या नावासमोरील निर्देशित जागेवरील **२** नमुद करणे असा आहे. तिसरा पसंतीक्रम याचा अर्थ मतपत्रिकेवर उमेदवाराच्या नावासमोरील निर्देशित जागेवर १, २ च्या नंतर **३** नमुद करणे असा आहे. याप्रमाणे पुढील पसंतीक्रम नमुद करावे.

१२. मतपत्रिकेत नमुद असलेल्या सर्व नावासमोर मतदार पसंतीक्रम देवू शकतो.

१३. **मतपत्रिकेवर पसंतीक्रम विद्यापीठाने पुरविलेल्या निळया शाईच्या बॉलपेनने अंकीत करता येईल.**

१४. मतदान करण्यापूर्वी मतपत्रिकेचे संपूर्ण निरिक्षण करावे व त्यावर दिलेल्या सूचना अवश्य वाचाव्या.

१५. कोणत्याही मतदाराने मतपत्रिका सोबत घेवून जाऊ नये.

१६. मतदान झाल्यानंतर मतपत्रिका मतपेटीतच टाकाव्या.

१७. मतपत्रिकेवर ओळख पटेल अशी कोणतीही खुण, चिन्ह, स्वाक्षरी करू नये. तसे आढळल्यास उपरोक्त मतपत्रिका रद्द करण्यात येईल.

१८. पसंतीक्रमाचे अंक हे फक्त इंग्रजी अथवा मराठी यापैकी कोणत्याही एका भाषेतीलच असावे.

१९. भाषेची सरमिसळ करून अंक नमुद केले असल्यास उपरोक्त मतपत्रिका बाद करण्यात येईल.

२०. मतपत्रिकेतील पसंतीक्रमांच्या अंकासमोर ०१, ०२, ०३ अशाप्रकारे ० सुरूवात करून पसंतीक्रम अंकीत करू नये. अशा पध्दतीची मतपत्रिका आढळल्यास ती बाद करण्यात येईल.

२१. मतपेटीमध्ये मतपत्रिका टाकल्यानंतर निर्धारित मार्गानेच बाहेर जावे, जेणेकरून मतदान कक्षात गर्दी होणार नाही.

२२. <u>अत्यंत महत्वाचे</u> –

अ) अतीसंवेदनशील मतदान केंद्रांची नावे.-

१) भगवंतराव कला वाणिज्य महाविद्यालय, एटापल्ली, जिल्हा गडचिरोली.

२) राजे विश्वेश्वरराव कला वाणिज्य महाविद्यालय, भामरागड, जिल्हा गडचिरोली.

३) भगवंतराव कला महाविद्यालय, सिरोंचा, जिल्हा गडचिरोली.

४) वनश्री कला महाविद्यालय, कोरची, जिल्हा गडचिरोली.

ब) वर नमुद ४ मतदान केंद्रात मतदानाची वेळ सकाळी ७.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत राहील तसेच उर्वरीत ३२ मतदान केंद्रावर मतदानाची वेळ सकाळी ८.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत राहील.

(दिपक जुनघरे)
कुलसचिव
तथा निवडणूक निर्णय अधिकारी
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

दिनांक १०-१२-२०१७